नायब तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली -२०२४/प्र.क्र. ११/ई-९
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १५ मार्च, २०२४.

वाचा :-

१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.

शासन आदेश:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार, नायब तहसीलदार संवर्गातील खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची आगामी सार्वत्रिक निवडणुक-२०२४ च्या अनूषंगाने/प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पदस्थापना करण्यात येत आहे .

अ.क्र.	नायब तहसिलदाराचे नाव	पदनाम	बदलीने करण्यात आलेली पदस्थापना
	१	२	३
१	श्री. डी. डी. कुलकर्णी	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय बिलोली, जि.नांदेड	नायब तहसीलदार (महसूल-२), तहसिल कार्यालय मंठा, जि. जालना या रिक्त पदावर
२	श्री.मधुकर ए. क्षिरसागर	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय उदगीर, जि. लातूर	नायब तहसीलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय अहमदपूर, जि. लातूर या रिक्त पदावर
३	श्री. म.अ.मोईज म. अ. अजीज	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय सेलू, जि.परभणी	नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय गंगाखेड, जि. परभणी या रिक्त पदावर
४	श्री. प्रभाकर केशवराव घुगे	नायब तहसीलदार (रोहयो), जि.का. जालना, जि.जालना	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय जालना, जि. जालना या रिक्त पदावर
५	श्री. व्ही. यु. भालेराव	नायब तहसीलदार (महसूल-२), तहसिल कार्यालय औंढा नागनाथ, जि.हिंगोली	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय औंढा नागनाथ, जि. हिंगोली या रिक्त पदावर
६	श्री. डी. एस. जोशी	नायब तहसीलदार (महसूल-२), तहसिल कार्यालय वसमत,	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय वसमत, जि. हिंगोली

		जि. हिंगोली	या रिक्त पदावर
७	श्री. ए.पी. भोजने	नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय वसमत, जि. हिंगोली	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय हिंगोली, जि. हिंगोली या रिक्त पदावर
८	श्री.एन.ए. शेख	नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय किनवट, जि. नांदेड	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय भोकर, जि. नांदेड या रिक्त पदावर
९	श्री.प्रकाश भिमराव सिरसेवाड	नायब तहसीलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय केज, जि. बीड	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय आष्टी, जि. बीड या रिक्त पदावर
१०	श्री अशोक नारायण भंडारे	नायब तहसीलदार (महसुल-२) तहसिल कार्यालय माजलगाव, जि. बीड	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय शिरुर कासार, जि. बीड या रिक्त पदावर
११	श्री.आर.एन.पत्रीके	नायब तहसीलदार (महसूल-२) तहसील कार्यालय शिरुर-अनंतपाळ, जि. लातुर	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय उदगीर, जि. लातुर (या श्री. क्षिरसागर यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
१२	श्री. एस. सी. धाराशिवकर	नायब तहसीलदार (महसुल-१), तहसिल कार्यालय उदगीर, जि. लातुर	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय चाकुर, जि. लातुर या रिक्त पदावर
१३	श्री. कुलदीप श्रीनिवास कुलकर्णी	नायब तहसीलदार (आस्थापना), जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव, जि. धाराशिव	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय लातूर, जि. लातूर या रिक्त पदावर
१४	श्रीमती रेखा चामनर	नायब तहसीलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय भोकर, जि. नांदेड	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय कंधार, जि. नांदेड या रिक्त पदावर
१५	श्री.ए.बी.धुमाळ	नायब तहसीलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय निलंगा, जि. लातूर	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय वाशी, जि. धाराशिव या रिक्त पदावर
१६	श्री.डी.पी .मरळे	नायब तहसीलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय नांदेड, जि. नांदेड	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय बिलोली, जि. नांदेड (या श्री. कुलकर्णी यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
१७	श्रीमती कच्छवे शितल हनुमानराव	नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय परभणी, जि. परभणी	नायब तहसीलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय सेलू, जि. परभणी (या श्री. अजीज यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर

२. सदर आदेश तात्काळ अंमलात येत असून, उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर तात्काळ रुजू होण्यासाठी ते धारण करत असलेल्या पदावरुन या आदेशान्वये एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

३. संबंधित अधिकारी नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत संबंधित विभागीय आयुक्त यांनी शासनास त्वरित कळवावे.

४. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयत्तेर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या उक्त तरतुदीनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापुर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६/१६/का. १४, दि.२३.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास, त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने सदर अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते सदर अधिका-याच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

७. उपरोक्त आदेश सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत असल्याने पदस्थापनेच्या ठिकाणी परिविक्षाधीन तहसीलदार वा अन्य अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन तात्पुरते व्यवस्थेने पदस्थापना दिलेली असल्यास अशा अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांनी अन्य रिक्त पदावर पदस्थापना द्यावी. या आदेशाद्वारे पदस्थापना करण्यात आलेले अधिकारी त्यांच्या पदस्थापनेच्या पदावर रुजू झाल्यानंतर दि.१५.०३.२०२४ च्या शासन पत्रानुसार तात्पुरत्या स्वरुपात सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या सेवा मूळ पदावर पूर्ववत करण्यात याव्यात.

८. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ही गैरवर्तणूक समजून त्यांचे विरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३१६१२४६१०४३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKANT MADHUKAR MOHITE

Digitally signed by SHRIKANT MADHUKAR MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=5b514d2c3257bba976c5a2de42be8a635bba691c05d1f65ed0ead155a190e90e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5F152866E6FC64E39CF88B9CB27AE0169A65B000039B269233C42B5B77F06B31, cn=SHRIKANT MADHUKAR MOHITE
Date: 2024.03.16 12:56:41 +05'30'

(श्रीकांत म. मोहिते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा. उपमुख्यमंत्री (गृह), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.
६. संबंधित जिल्हाधिकारी.
७. प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता) नागपूर/मुंबई.
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९. संबंधीत अधिकारी (विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत).
१०. निवडनस्ती, कार्यासन ई-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.